FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154127

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: लाप्रवि, मुंबई, पहिली खबर क्र. FIR No.: १८, वर्ष Year: 2021, दिनांक Date: 25/03/2021

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र.अधिनियम १९८८, कलमे Sections: ७,१२
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day: सोमवार, तारीख पासून Date from: 22/02/2021, वेळ Time ..........., तारीख पर्यंत Date to: 23/03/2021, वेळ Time ...........

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 22/02/2021, वेळ Time: 11.00 वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 06/2021, तारीख Date: 25/03/2021 वेळ Time: 18.30

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी — लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: उत्तरेस १५ कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ...........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी (पश्चिम), मुंबई, ठिकाणचे नंबर No. if any ..........., गल्ली Ward ..........., रस्त्याचे नाव Name of road ...........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name: श्रीमती आश्विनी बोरुडे
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: सतिश बोरुडे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ३५ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No. ...........
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ........... (f) व्यवसाय Occupation ...........
   (g) धर्म Religion ..........., जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता Address: शिपका चावडी चौक, कम नं. ८, इराणी वाडी, हेमु कलानी रोड नं. ४, कांदिवली (पश्चिम), मुंबई — गल्ली / सर्व्हे Ward, घर / नाव नं. House/Name No. ..........., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..........., पॅन नं. PAN No. ..........., वोटर्स न. Card No. ...........

   रस्त्याचे नाव Road ..........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., पो. स्टे. P. Stn. ...........

   तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   (१) प्रकाश लक्ष्मण यरव, वय ४५ वर्षे, धंदा-नोकरी (भांडारपाल)
   (२) बिरेंद्र कुमार सिन्हा, वय ५८ वर्षे, धंदा-नोकरी (वरिष्ठ विभागीय लेखा अधिकारी)
   सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी (पश्चिम), मुंबई.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

फिर्याद                                        दिनांक- २५/०३/२०२१

फिर्यादी श्रीमती आश्विनी सतिश बोरुडे, वय ३५ वर्षे, धंदा- वेस्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट, रा.ठी.- शिपका रावजी चाळ, रुम नं. ८, इराणी वाडी, हेमू कलाणी रोड नं. ४, कांदिवली (प.), मुंबई यांची सविस्तर फिर्याद स्वतंत्र कागदावर संगणकीकृत करण्यात आली आहे. तीच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature] 25/03/2021

(विजयकुमार डोके)
सहायक पोलीस आयुक्त,
सा.प्र.वि., मुंबई

[signature] 25/03/2021

फिर्याद दिनांक २५/०३/२०२१

माझे नांव अश्विनी सतीश बोरूडे, वय ३५ वर्षे, व्यवसाय –स्वच्छ भारत अभियान अंतर्गत खत निर्मीती, रा.ठि. – शिपका रावजी चाळ, रुम नं ८, इराणीवाडी, हेमु कलानी रोड नं. ४, कांदीवली (प.) मुंबई–४०००६७. मो.क्र ७७१५८३०९९० असे आहे. मी समक्ष फिर्याद देत आहे की,

मी वरील प्रमाणे असुन वर दिलेल्या पत्यावर माझ्या कुटुंबासह राहते. मी स्वच्छ भारत / स्वच्छ मुंबई या उपक्रमांतर्गत काम करते. यामध्ये स्वच्छता तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती तसेच विविध ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण सुका कचरा व ओला कचरा यात करुन ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मिती करण्याचे काम करते. हे काम मी मुंबई महानगरपालिका, शाळा, कॉलेज तसेच विविध सोसायटी येथे करते.

सार्वजनिक बांधकाम विभाग, वांद्रे, मुंबई येथील गर्व्हमेंट कॉलनी येथे प्रायोगिक तत्वावर मी हे काम माहे ऑगस्ट–२०१८ पासुन चालु केले. सार्वजनिक बांधकाम विभागाकरीता केलेल्या कामाच्या एकाच बिलाची रक्कम मला मिळाली आहे. उर्वरीत बिलांची रक्कम रु. २१,९३,०००/– मंजुर करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी (पश्चिम), मुंबई येथील भांडारपाल श्री. प्रकाश लक्ष्मण परब तसेच वरिष्ठ विभागीय लेखा अधिकारी श्री. बिरेंद्र कुमार सिन्हा यांनी बिलाच्या साधारण ४५% इतकी रक्कम लाच म्हणुन दयावी लागेल असे सांगितले. मला त्यांना लाच दयायची इच्छा नव्हती म्हणुन मी, अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई येथे दिनांक ११/०१/२०२१ रोजी लेखी तक्रार दिली. माझ्या लेखी तक्रारीवरुन दोन शासकीय पंचाना बोलावून श्री. प्रकाश लक्ष्मण परब तसेच श्री. बिरेंद्र कुमार सिन्हा यांनी माझ्याकडे लाच मागीतली आहे किंवा कसे? याबाबत दिनांक ११/०१/२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, श्री. प्रकाश परब यांनी फंड नसल्याने बिल थांबलेले आहे असे सांगितले. त्यानंतर श्री. बिरेंद्र सिन्हा यांची भेट घेतली असता त्यांनी फंड आला की पैसे मिळतील, काम होवू दया अगोदर असे सांगितले. त्यामुळे पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दिनांक २२/०१/२०२१ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात आली. सदरवेळी श्री. प्रकाश परब व श्री. बिरेंद्र सिन्हा यांची भेट झाली. सदरवेळी श्री. प्रकाश परब यांनी वर्क ऑर्डर काढली आहे. फंड नसल्यामुळे बिल थांबलेले आहे. फंड आल्यावर तुम्ही मोठया साहेबांना भेटा. आताच भेटायची गरज नाही. त्यानंतर मी व पंच यांनी श्री. वीरेंद्र सिन्हा यांची भेट घेतली. त्यावेळेस श्री बिरेंद्र सिन्हा यांनी हाताने पंचास बाहेर थांबण्यास सांगितल्याने, मी एकटीच केबिनमध्ये गेले. त्यावेळी त्यांनी मला फंड उपलब्ध नाही, त्याकरीता मोठया साहेबांना भेटा असे सांगितले. त्यानंतर पुन्हा मी श्री. प्रकाश परब यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी पुन्हा फंड आल्यानंतरच मोठया साहेबांना भेटा असे सांगितले. त्यामुळे पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दिनांक ०१/०२/२०२१ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात आली. सदरवेळी श्री. प्रकाश परब यांनी तुमचे काम झाले आहे असे सांगुन वरिष्ठांपासुन ते शिपायांपर्यंत टक्केवारीप्रमाणे पैसे दयावे लागतात याबाबत चर्चा झाली. अशाप्रकारे एकुण ९,८६,०००/– रुपये लाच म्हणुन दयावे लागतील असे सांगितले. त्यानंतर मी पंचासह तेथुन निघुन आले. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा केलेला आहे.

Borude

Scanned with CamScanner

दिनांक ०३/०२/२०२१ रोजी श्री. प्रकाश परब यांनी मला लाचेच्या रकमेपैकी काही रक्कम घेवुन यायला सांगितले होते. त्यानुसार मी माझेकडे असलेली रक्कम रू. २५,०००/– घेवुन लाप्रवि, मुंबई कार्यालयास आले. सदरवेळी चार लाख इतकी रक्कम खेळण्यातील नोटा वापरण्याचे ठरले. असे एकुण रू. ४,२५,०००/– देण्याचे ठरले व पुढे करण्यात येणा–या सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला पोनि डोके यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच सपोआ वाव्हळ यांनी माझी अंगझडती घेवून, मी हजर केलेल्या लाचेच्या नोंटांना अॅन्थ्रासिन पावडर लावणे, अॅन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म, प्रात्यक्षीक दाखविणे, लाचेच्या नोटा माझ्या पर्सच्या आत प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवणे, लाच स्विकृती नंतर इशारा करणे याबाबत पंचासमक्ष कारवाई करून त्याबाबतचा पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर पोनि डोके यांनी तेथे मला सविस्तर सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर चालू करून देवून मला पंचासह व पथकासह दिनांक ०३/०२/२०२१ रोजी लाच रक्कम लोकसेवक परब यांना देण्यासाठी रवाना केले. तेंव्हा मी लोकसेवक परब यांना त्यांचे कार्यालयात भेटायला गेले असता, त्यांनी मला कार्यालयीन निधीची रक्कम त्यांचे कार्यालयाला आल्यानंतर लाचेची रक्कम घेवुन बोलावले व सदर दिवशी लाचेची रक्कम स्वीकारली नाही. त्यामुळे सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर मी वरचेवर लोकसेवक परब यांचेशी मोबाईल फोनवर संपर्कात होते, जेणेकरून कार्यालयीन फंडाची रक्कम अंधेरी कार्यालयात आल्यावर, मला लगेच माझे बिलाचे रकमेबाबत विचारणा करता येईल. दि. २५/०२/२०२१ रोजी कार्यालयीन फंडाची रक्कम आली आहे किंवा नाही हे निश्चित करण्यासाठी आम्ही पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी–पश्चिम, मुंबई या कार्यालयात जाण्याचे ठरले. त्यानुसार अंधेरी पश्चिम येथील लल्लुभाई पार्क, येथे ठरल्याप्रमाणे आले. सदर ठिकाणी सापळा पथक देखिल आले व मी तेथुन पंचासह सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी पश्चिम कार्यालयात गेले. तेथे मी शंखपाळे, कार्यकारी अभियंता यांचेसमवेत माझे प्रलंबित बिलाबाबत चर्चा केली असता, त्यांनी अदयाप कार्यालयीन फंड आला नसल्याचे सांगितले.

दि. २२/०३/२१ रोजी मी लोकसेवक परब यांना कार्यालयीन फंड अंधेरी कार्यालयात आला आहे का बाबत विचारणा केली असता, त्यांनी फंड अंधेरी कार्यालयात आला असल्याचे सांगुन, कार्यालयात येवुन जाण्यात सांगितले. सदर बाबत मी सपोआ वाव्हळ मॅडम यांना फोन करून सांगितले असता, दि. २३/०३/२०२१ रोजी सदर बाबत पडताळणी करण्याचे ठरले. त्यानुसार मी दिनांक २३/०३/२०२१ रोजी अंधेरी पश्चिम येथील लल्लुभाई पार्क, येथे ठरल्याप्रमाणे आले व तेथुन पंचासह सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी पश्चिम कार्यालयात गेले. पंचाना बाहेरच थांबवुन मी एकटीच कार्यालयात गेले असता, तेथे नव्याने नेमणुक झालेले श्री नाईक, कार्यकारी अभियंता यांची भेट झाली असता, त्या कार्यालयातील श्रीमती गुंजन दिघावकर यांना त्यांनी माझे काम लवकर करण्यास सांगितले. मी परब यांना याबाबत सांगितले असता, त्यांनी श्रीमती दिघावकर यांना मध्ये घेवु नका, नाहीतर त्यांनापण पैसे दयावे लागतील, असे मला सांगितले व मी माझे बिलांचे रकमेबाबत त्यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी मला एक–दोन दिवसांत सांगतो असे सांगितले. त्यानंतर मी तेथुन निघुन ठरलेल्या ठिकाणी लल्लुभाई पार्क येथे पंचासह परत आले.

Rokude

Scanned with CamScanner

दि. २४/०३/२०२१ रोजी दुपारी साधारण ०१.४७ वाजता मी श्री परब यांना मोबाईलवर संपर्क केला असता, त्यांनी मला लाचेची रक्कम घेवुन त्यांचे कार्यालयास येण्यास सांगितले. तेव्हा मी सदरची माहीती लागलीच सपोआ निलम वाव्हळ यांना दिली असता, त्यानुसार सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे त्यांनी मला सांगितले. त्यानुसार आम्ही आज दि. २४/०३/२०२१ रोजी ०४.०० वाजताचे दरम्यान लल्लुभाई पार्क, अंधेरी पश्चिम येथे सापळा पथकाने भेटण्याचे ठरले व त्यानुसार सापळा पथक व पंच सदर ठिकाणी आले.

मी माझेकडे असलेली रक्कम रू. २५,०००/– भारतीय चलनाच्या नोटा घेवुन सदर ठिकाणी आले. सदरवेळी चार लाख इतकी रक्कम खेळण्यातील नोटा वापरण्याचे ठरले. असे एकुण रू. ४,२५,०००/– देण्याचे ठरले व पुढे करण्यात येणा–या सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला सपोआ डोके यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच सपोआ वाव्हळ यांनी माझी अंगझडती घेवून, मी हजर केलेल्या लाचेच्या नोंटांना अ‍ॅन्थ्रासिन पावडर लावणे, अ‍ॅन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म, प्रात्यक्षीक दाखविणे, लाचेच्या नोटा माझ्या पर्सच्या आत प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवणे, लाच स्विकृती नंतर इशारा करणे याबाबत पंचासमक्ष कारवाई करून त्याबाबतचा पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर मी पंचासह सपोआ डोके यांचे खाजगी वाहनाने सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी पश्चिम यांचे कार्यालयाचे जवळ आलो असता, थोडे आधी उतरून चालत सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी पश्चिम यांचे कार्यालयात गेलो. सदर कार्यालयात मी एकटीच आत मध्ये गेले. तेथे मी पहील्या मजल्यावर लोकसेवक परब यांना भेटले, व त्यांना देण्यासाठी पैसे आणल्याचे सांगितले. मी त्यांना लोकसेवक सिन्हा यांना फोन करायला सांगितले असता, त्यांनी कशाला बोंबाबोंब करता असे मला म्हटले. तेव्हा मी लोकसेवक परब यांना, मी सिन्हा साहेबांना भेटुन येते असे सांगुन, तळमजल्यावर त्यांना भेटायला गेले. त्यांना मी, मला परब यांनी पैसे घेवुन बोलावले होते, तर तुमचे पैसे पण परब यांचेकडे देवु का अशी विचारणा केली असता, त्यांनी मला हो म्हणुन सांगितले. तेव्हा मी पुन्हा पहिल्या मजल्यावर परब यांचेकडे आले व माझ्या पर्समधील पिवळया रंगाच्या प्लास्टिकचे पिशवीतुन रू. २,१२,०००/– व रू. २,१३,०००/– रक्कम असलेली दोन पांढऱ्या रंगाची पाकीटे परब यांचेकडे दिली. त्यानंतर मी लगेचच सदर बिल्डींगचे खाली येवुन डाव्या हाताने माझ्या चेहऱ्यावरील मास्क काढुन पुन्हा घालुन, लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला, त्यावेळी माझ्या आजुबाजुला असलेले सापळा पथक व पंच तेथे हजर झाले व त्यांनी लोकसेवक परब यांचे केबीनमध्ये जावुन त्यांचे दोन्ही हात पकडले व पथकातील सपोआ डोके यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेऊन मला बाजुला थांबण्यास सांगितले. तसेच पथकातील काही अंमलदारांना लोकसेवक सिन्हा यांना त्यांचे केबिनमध्ये अटकाव करण्यासाठी तळमजल्यावरील त्यांचे कार्यालयात पाठविले.

थोडया वेळाने सपोआ डोके यांनी मला परब यांचे केबीनमध्ये बोलावले व कृत्रीम अंधार करून माझ्या हातांची, कपडयांची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली तपासणी केली तेंव्हा माझे उजव्या हातावर फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली तसेच माझ्या पर्समधील लाचेची रक्कम ठेवलेली पिवळया प्लास्टिकच्या पिशवीची पाहणी केली असता त्याचे आतील बाजुस फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली. सदर प्लास्टिकची पिशवी सपोआ डोके यांनी त्यांचे ताब्यात घेतली. त्यांनतर पंचांसमक्ष सपोआ वाव्हळ यांनी माझी अंगझडती घेऊन माझ्या सामानाची दिव्याखाली तपासणी करून माझे सामान परत दिले. त्यानंतर सपोआ डोके व सापळा पथकासह मी लाप्रवि, वरळी, मुंबई कार्यालयात परत आलो. लाप्रवि,वरळी

Scanned with CamScanner

मुंबई कार्यालयात परत आल्यानंतर सपोआ डोके यांनी मला पंचासमक्ष विचारणा केल्यावरुन मी, परब यांना लाच रक्कम देण्यासाठी रवाना केलेपासुन परब यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी इशारा करेपर्यंत घडलेली हकिकत सांगावी. त्यावर मी वरिलप्रमाणे हकिकत सांगितली. पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक व माझ्यात वेळोवेळी झालेले संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

एकंदरीत दिनांक ११/०१/२०२१ रोजी श्री परब, भांडारपाल व श्री सिन्हा, लेखापाल यांनी मी केलेल्या कामाची बिलाची रक्कम रु. २१,९३,०००/- मंजुर करवुन घेण्यासाठी माझ्याकडे माझ्या एकुण बिलाच्या ४५ टक्के रक्कम रूपये ९,८६,०००/- लाच म्हणुन मागणी केली. मी दिलेल्या लेखी तक्रारीवरून सपोआ डोके यांनी पंचासमक्ष दिनांक ०१/०२/२०२१ रोजी लाच पडताळणी केली व आज दिनांक २४/३/२०२१ रोजी परब यांनी माझेकडून रु. ४,२५,०००/- रक्कम लाच म्हणुन स्वीकारली असता, सापळा पथकाने परब यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे. तसेच श्री सिन्हा यांनी त्यांच्या हिश्याची लाचेची रक्कम परब यांचेकडे देण्यास सांगुन सदर गुन्हयास प्रोत्साहन दिले म्हणुन पकडले आहे. श्री. प्रकाश लक्ष्मण परब, भांडारपाल व श्री बिरेंद्र कुमार सिन्हा, वरिष्ठ विभागीय लेखा अधिकारी यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी माझी तक्रार देत आहे.

समक्ष,

25/03/2021

( विजयकुमार डोके )

सहाय्यक पोलीस आयुक्त,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... पडताळणी करून

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ......

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे स्वच्छ भारत / स्वच्छ मुंबईच्या योजनेअंतर्गत केलेल्या कामाचे बील रु.२१,९३,०००/- मंजूर करून देण्यासाठी आलोसे क्र.१ यांनी दि. ०१/०२/२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान स्वतःकरीता व वरिष्ठांकरीता एकूण बिलाच्या ४% रक्कम रु. ९,८६,०००/- लाचेची मागणी केली. दि. २४/०३/२०२१ रोजीच्या सापळा कारवाईवेळी आलोसे क्र.२ यांने त्यांच्या हिश्याची लाचेची रक्कम आलोसे क्र.१ कडे देण्यास सांगुन गुन्ह्यास प्रोत्साहन दिले व आलोसे क्र.१ यांने स्वतःकरीता व वरिष्ठांकरीता लाचेची रक्कम रु. ४,२५,०००/- स्विकारली. म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७,१२ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

स.पो.आ. विजयकुमार डोके.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)...... Rank...... No......
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to...... (3) Transferred to P. S. ......
District...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 25/03/2021

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature] 25/03/2021
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..विजयकुमार डोके.
पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त,
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई......

Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख......
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner